महा मेट्रो

PUNE METRO

# मेट्रोच्या खडकी येथे रेल्वे क्रॉसिंग पुलासाठी ६०० टन वजनाच्या गर्डर चे लाँचिंग



आज दि. ११.०३.२०२२ रोजी महामेट्रोच्या पीसीएमसी ते स्वारगेट या मार्गामध्ये पीसीएमसी ते रेंज हिल हा टप्पा उन्नत मार्गाचा आहे. हा उन्नत मार्ग दक्षिण खडकी येथे जुना मुंबई- पुणे हाय वे मार्गाकडून रेंज हिल येथे वळतो. तिथे मेट्रोचा खडकी ते रेंज हिल हा मार्ग मुंबई – लोणावळा लोहमार्गाचे दोन रेल्वे मार्ग ओलांडून जातो**.**

रेल्वे मार्ग पार करण्यासाठी ७९ मी. लांब वेब गार्डरची उभारणी गेल्या सहा महिन्यापासून खडकी येथे चालू होती. या गर्डरला जोडण्यासाठी विशीष्ट धातूचे ३०,००० वोल्ट वापरण्यात आले आहेत . वेब गर्डरचे रेल्वे रुळावरून लाँचिंग करण्यासाठी पुणे लोणावळा रेल्वे मार्ग ५ तास बंद ठेवणे गरजेचे होते. आज दि. ११.०३.२०२२ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ असा ५ तास रेल्वेचा ब्लॉक मिळाल्यामुळे तिथे काम पूर्ण करण्यात आले.

या ओपन वेब गर्डर चे वजन ६०० टन असून त्याची लांबी ७९ मी. आहे . या ६०० टनी ओपन वेब गर्डर चे उभारणी करण्यासाठी६५० टन वजनाचे टेम्पंररी सपोर्ट स्ट्रँकचर बनविण्यात आले होते . या ओपन वेब गर्डरची रुंदी ९.७ मी. , उंची १० मी. व लांबी ७९ मी. आहे आणि तो E ३५ D स्टील ग्रेड प्लेट पासून बनविण्यात आला आहे. या गर्डरला जोडण्यासाठी विशीष्ट धातूचे ३०,००० वोल्ट वापरण्यात आले आहेत. संपूर्ण ६०० टनी ओपन वेब गर्डर विशेष

बनविलेल्या रोलर वर ठेवण्यात आला होता. दोन मोठ्या विचिंग मशीनचा उपयोग करून पुश लाँच मेथडने हा महाकाय गर्डर पुढे सरकावण्यात येऊन लाँच केला गेला. या गर्डरच्या लाँचिंग मुळे पीसीएमसी ते रेंज हिल ह्या उन्नत मार्गाला चालना मिळाली आहे.



ओपन वेब गर्डर टाकण्याचे काम अत्यंत जोखमीचे होते. या कामासाठी रेल्वे सुरक्षा आयुक्त व मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त यांची परवानगी घेण्यात आली होती. मध्य रेल्वे मुख्यालयाची परवानगी मिळाल्यानंतर आज हे काम हाती घेण्यात आले.

